

# सहकाऱ्यांचे स्वभावरंग

श्री. मिलिंद गाडगीळ
बँकिंग तज्ञ

सहकाराबद्दल सगळेजण नेहमी बोलत असतात पण सहकाऱ्याबद्दल फार कमी जण बोलतात. सहकारी साखर कारखाना असतो तशी काही माणसं गोड असतात. दूध उत्पादक संघ असतो तशी काहीजण निर्मळ असतात. सूतगिरणी असते तशी काही माणसं सुतासारखी सरळ असतात आणि नोकरीत कामाची गिरणी सतत चालू ठेवतात. कुक्कुटपालन संस्था असते तशी काही माणसं नोकरीत कुकुचकु करत मजेत दिवस काढत असतात. अशा अनेक तऱ्हेच्या सहकाऱ्यांबद्दल आज आपण बोलणार आहोत.



'काम करणारे कामच करत राहतात आणि मजा मारणारे मजाच मारत राहतात.''आम्हाला काही पुढे पुढे करायला जमत नाही.' 'मी हा असा आहे. पाहिजे तर घ्या, मला काही गरज नाही कोणाची.' 'मला काही फरक पडत नाही नोकरी सोडली तरी.' 'लाईन चुकली हेच खरं, जाऊ देत दिवस काढायचे.' 'असे संवाद अनेक कार्यालयात कामकाजाच्या वेळेत हमखास ऐकायला मिळतात आणि निकोप वातावरण होळी साजरी करायला गेलं आहे हे लगेच लक्षात येतं. कामाच्या ठिकाणी असंख्या माणसांचे अगणित स्वभाव पाहायला, अनुभवायला मिळतात. आज काही स्वभाव छटा आपण बघणार आहोत. स्वभावाला औषध नाही, अशी म्हण आहे खरी, पण औषध उपचार काय प्रथमोपचार मनापासून केला तरी स्वभाव बराचसा बदलता येईल. फक्त आपल्या स्वभावात आवश्यक तो योग्य बदल करायचा हे मनापासून ठरवायला हवं आणि त्याचा दैनंदिन स्वाध्याय करायला हवा.

नोकरीच्या ठिकाणी वातावरणात ऑक्सिजन इतकाच महत्त्वाचा घटक उपस्थित असतो तो म्हणजे गॉसिपिंग. बदली, बढती, पदोन्नती, पदावनती, सस्पेंड, डिसमिस, झेंगट (सोपे प्रतिशब्द भानगड, लफडं वगैरे) मेमो, रेशन घेणे (बिन पाण्याने याअर्थी) एन्क्वायरी अशा एकूण दहा घटकांवर गॉसिपिंगचा दशावतारी खेळ सुरु असतो. या सगळ्या घटक पदार्थातून कामाच्या ठिकाणचं वातावरण आणि कर्मचाऱ्यांचा स्वभाव बनत जातो. एकतर स्वभाव छानपैकी घडतो, नाही तर बिघडतो, यापैकी दुसरी शक्यता जास्त प्रमाणात सर्वत्र पाहायला मिळते. अशा प्रकारच्या कार्यालयांमध्ये धुळवड आणि रंगपंचमी या सणांना राष्ट्रीय सणांचे महत्त्व असते. पहिली शक्यता असते पण तशी दुर्मिळच. कारण सगळे छानपैकी घडत गेलं तर राग, द्वेष, मत्सर, असूया, सूडबुद्धी, विघ्न संतोषीपणा, माज, स्पर्धा या सद्गुणांचा वापरच होऊ शकणार नाही. मग माणूस म्हणून जगण्यात काय अर्थ आहे. नोकरीतल्या जगन्नाथाचा रथ ओढायला कशी झक्कापक्की सतत झाली पाहिजे. त्यामुळे खेळ असा रंगात येतो की, राजकारण असं नसानसात भिनत जातं. असो, पुन्हा मूळ विषयावर येतो. सहकाऱ्याचे स्वभाव रंग......जरा विनोदी स्वभावाच्या व्यक्तीपासून सुरू करू. काही माणसे नोकरीच्या ठिकाणी सतत विनोदी बोलून आसपासच्या सहकाऱ्यांना हसवत असतात. माझ्या माहितीत असाच एक सहकारी होता, सतत विनोदी बोलायचा. साधं कोणी विचारलं 'काय शर्ट नवीन का?'

'नाही वडिलांचा आहे पण ते गेल्यावर लगेच वापरायला काढणं वाईट दिसतं ना म्हणून आज घातला.' हशा... काहीजण कोटीबाज असतात. कधी नव्हे ते कोणी सांगितलं 'काल मी वेंगा बॉईज अल्बम ऐकला' तर लगेच 'काय लेंगा बॉईज' पुन्हा हशा. काहीजण छोटे विनोद करतात. वडील हरवलेल्या मुलाचे आडनाव काय असेल ? 'बागुल'

काहींचा चेहरा सतत सुतकी आणि बोलणं चिडचिड. अवघड ठिकाणचं गळू बरंच होत नाही असा चेहरा ठेवतात. व्यवस्थेबद्दल प्रचंड नाराजी पण आपणही त्या व्यवस्थेचाच एक भाग आहोत हे लक्षातच घेत नाहीत. शक्यतो कोणी काम घेऊन येऊ नका हा दृष्टिकोन असतो. अंगाला तेल लावूनच बसलेले असतात. कोणीही काम सांगितल की घरंगळूनच पडतात. पूर्वीचे दिवस राहिले नाहीत असं पहिल्या वर्षापासूनच म्हणत असतात.

काही जण प्रचंड धार्मिक. दत्त दत्त ऐसे लागले ध्यान! म्हणताना कामात आपलं ध्यान लागत नाही हेही विसरुन जातात. कामाच्या ठिकाणी सतत देवदर्शन, पोथी, प्रसाद वाटप, अभिषेक, माळा, खडे, पत्रिका, अंगारा पुडी यातच गुंतून पडतात. कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेत, यावर नितांत श्रद्धा ठेवत ऑफिसमधलं कार्य करण्यास तेवढे असमर्थ ठरतात.

काही जणांचे स्वभाव न्युट्रलवर असतात. सगळ्या ठिकाणी असतात पण कशातच नसतात. स्पष्टपणे मत जिथे आवश्यक असते, तिथेही जीभ जड होते. 'तुम्ही म्हणाल तसं', यावर फार भक्ती त्यामुळे कधी विवाद्य ठरत नाहीत. काही ताडकन बोलतात. स्पष्ट, रोखठोक, कोणी दुखावल्याची पर्वा न करता मत मांडतात पण मनात काही ठेवत नाहीत. जीभेला एका बाजूला सुरीची आणि दुसऱ्या बाजूला वस्तऱ्याची धार असते. पण अशामुळे त्यांच्या चांगल्या सांगण्याकडे दुर्लक्ष होतं आणि समोरच्याच्या मनात त्यांचे दुखरे शब्द घर करुन राहतात.

काहीजण बिरबल असतात. जे पोचवायचं ते न बोलता पोहोचवतात. बोलतांना मात्र जिभेवर स्वीट मार्ट उघडून ठेवतात.

मुका मार यावर खास हुकूमत. उर्मट माणसांना हे कधी उलट उत्तर देत नाहीत. फक्त उर्मट व्यक्ती यांना उर्मट बोलून खुर्चीत जाऊन बसली की लगेच हळूहळू लक्षात येतं, खुर्चीतून बाभळीचे काटे रुतू लागले आहेत. इकडे बिरबल बाभळीची पेरणी वाढवत जातात. सॉरीचा खलिता आला की मगच वेदनेला उतार पडू लागतो.

काही व्यक्ती ऑफिसमध्ये गंभीर वागतात आणि ऑफिसच्या बाहेर आलं की एकदम हसतमुख. खुर्चीत असताना, 'उघड्या पुन्हा जाहल्या जखमा उरातल्या', हे गाणं आणि ऑफिसच्या बाहेर आलं की, 'फुलले रे क्षण माझे फुलले' सुरू होतं. याला म्हणतात घर आणि ऑफिस यामधील सीमा रेषा राखणं.

ऑफिसमध्ये काहीजण खूप संतुलित असतात. सगळं कसं मोजून मापून तोलून. वाहवत जाणं हा प्रकार नाहीच, शत्रुत्व नाही आणि गळ्यात गळे नाही. किंमत आणि हिंमत याची योग्य जाण असते. सर्वांगी समतोल त्यामुळे यावर फार लिहीत नाही.

जशा काही व्यक्ती शंकेखोर असतात तशा काही सल्लेखोर असतात, म्हणजे खोऱ्यानं सल्ले देत फिरतात. चुकून कोणी सांगितलं की, दिवाळीमध्ये केरळला जातो आहे बॅकवॉटरला. तर लगेच सल्लेखोर 'अरे दिवाळीत कशाला, गणपतीत जा आणि केरळला कशाला, हिमाचल प्रदेशात जा. समोरच्याच्या नियोजनाचा पार शीर्षासन करुन ठेवतात. केरळ पासून एकदम हिमाचल प्रदेश. बर स्वत: हनुमान टेकडीवरही गेलेले नसतात. पण मोफत सल्ला केंद्र चालू राहिले पाहिजे. ह्या सल्ला देणाऱ्यांना बऱ्याच वेळा सतत प्रश्न विचारायची वाईट खोड असते. कुणी सांगितल फोर व्हीलर घेतली की लगेच सरबत्ती सुरू. तर पुढे होऊन

कुठली घेतली, केवढ्याला घेतली, आत्ताच का घेतली? पार बेजार करतात प्रश्न विचारून विचारून. पुढे त्यांना कोणी बाबागाडी घेतली तरी सांगेनासं होतं. अगदी सर्दी झाली असं सांगितलं तरी सल्लेखोर, 'सर्दी? मुळव्याध का नाही? अरेच्चा ही व्याधी मुळापासून उखडून टाकावी असं आपल्याला अशा तहेच्या माणसांबाबत वाटत राहतं.

काहींचा स्वभाव लहरी असतो. कधी मोकळेपणाने बोलतील आणि कधी अबोला धरतील याचा काही नेम नसतो. पावसाळा, सणवार आणि शुभकार्य हा कालावधी म्हणजे लहरी मंडळींचा सीझन असतो. सहकाऱ्याच्या वाढदिवसाला कोणीही कितीही केकचा आग्रह केला तरी तुकडा सुद्धा खात नाहीत आणि तेच कुणी गेल्याच कळलं तर पुढे होऊन मदत करतील आणि तेराव्याचं जेवायला जातात. कशाचा काही अंदाजच लागत नाही. असो.

शेवटी सोशीकता हाही स्वभाव असतो, हे लक्षात येताच लेख आटोपता घ्यावासा वाटायला लागलं आहे. तेव्हा प्रतिनिधिक वाटाव्यात एवढ्याच स्वभावछटांचा उल्लेख येथे केलेला आहे. सरतेशेवटी असंख्य स्वभावछटा एकत्र येऊन प्रत्येक संस्थेतली कार्यसंस्कृती तयार होत असते. तेव्हा संस्थेला हितकारक असणारी स्वभावधारणा अंगीकारत गेल्यास नोकरीच्या ठिकाणची वाटचाल दुतर्फा लाभदायी ठरेल स्वत:साठी आणि संस्थेसाठीही!!

*****


शुभ दिपावली

महेश बँक, पुणे खास उत्सवानिमित्त आकर्षक व्याजदरात जाहीर करत आहे



८.५०% पासून
गृह कर्ज
(कमाल कर्ज मर्यादा रु. १.४०कोटी)



८.५०% पासून
चारचाकी कर्ज



१०.००% व्याज दराने
दुचाकी कर्ज

तसेच वैयक्तिक कर्ज | प्रोफेशनल कर्ज | शैक्षणिक कर्ज | सोने तारण कर्ज
अशा विविध कर्ज योजना उपलब्ध

अटी व शर्ती लागू.

कमीत कमी व्याजदर · नाममात्र प्रोसेसिंग फी · त्वरित कर्ज मंजूरी · कोणतेही छुपे शुल्क नाही

श्री. जुगलकिशोर पुंगलिया
अध्यक्ष

श्री. मिलिंद गावसाने
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. गोपाळ राठी
उपाध्यक्ष

महेश सहकारी बँक लि., पुणे
372/73/74, Market Yard, Gultekdi, Pune - 411037 Ph.: 020-242633 41/42/43
M.: 9028014801 Email: msbl@maheshbankpune.in W: www.maheshbankpune.in